# एका ऋषींनी दिले एका ऋषींना भक्तिरसाचे ज्ञान

## श्रीभागवत पुराणातील एक कथा

*गुरुमाई चिद्विलासानंद यांच्याद्वारे पुनःकथित*

महर्षी वेदव्यास हे भारताच्या इतिहासातील अत्यंत विख्यात विद्वानांपैकी आणि आध्यात्मिक गुरूंपैकी एक मानले जातात. भारताच्या शास्त्रीय परंपरेमधील त्यांचे योगदान अतुलनीय आहे. ‘वेदव्यास’ या त्यांच्या नावाचा अर्थ आहे ‘वेदांचे संकलक.’ त्याबरोबरच, त्यांनी महाभारत लिहिले आणि छत्तीस पुराणांची रचना केली. हे मूलभूत ग्रंथ त्यापूर्वी केवळ मौखिक परंपरेने अस्तित्वात होते. वेदव्यास हे एक सद्गुरू होते आणि त्यांचा सन्मान करण्यासाठी त्यांच्या शिष्यांनी गुरुपौर्णिमेच्या उत्सवाचा शुभारंभ केला.

एके दिवशी, देवर्षी आणि संगीतज्ञ असलेल्या नारदमुनींनी महर्षी वेदव्यासांची भेट घ्यायचे ठरवले. वीणावादन करत आणि आनंदोल्लासाने “नारायण, नारायण,” हे भगवन्नाम गात, ते प्राचीन व पवित्र अशा सरस्वती नदीच्या तीरावर स्थित असलेल्या वनातून जात होते. ते वन हिरव्यागार झाडाझुडपांनी, गोड व रसाळ फळांनी आणि घनदाट छायादार वृक्षांच्या उपवनांनी भरलेले होते. झाडे रंगीबेरंगी फुलांनी डवरलेली होती आणि अवघे वायुमंडल मंत्रमुग्ध करणाऱ्या सुवासाने दरवळत होते. या नंदनवनातच महर्षी वेदव्यासांचा आश्रम वसलेला होता.

नारदमुनी जेव्हा तिथे पोहोचले, तेव्हा त्यांनी पाहिले की, कुटीच्या बाहेर असलेल्या वटवृक्षाखाली महर्षी वेदव्यास बसले आहेत. नारदमुनींना हे पाहून आश्चर्य वाटले की, आदरणीय ऋषी अत्यंत उदास आणि हताश दिसत आहेत. महर्षी वेदव्यास अगदी स्तब्धपणे बसले होते, त्यांचे खांदे वाकले होते जणू त्यांच्यावर एखादे अवजड ओझे असावे, चिंतेने त्यांच्या कपाळावर आठ्या पडल्या होत्या आणि नजर शून्यात हरवली होती. नारदमुनींना हे स्पष्टपणे दिसत होते की, कोणतीतरी चिंता महर्षींना आतल्याआत सतावते आहे.

नारदमुनींच्या संकीर्तनाचा मधुर स्वर ऐकून महर्षी वेदव्यास आदराने उभे राहिले व त्यांनी देवर्षींना अभिवादन केले आणि मग आपल्या शेजारील आसन ग्रहण करण्यास त्यांना आमंत्रित केले.

महर्षी वेदव्यासांनी दाखवलेले आसन नारदमुनींनी ग्रहण केले आणि महर्षींच्या चिंतातुर मुखाकडे लक्षपूर्वक पाहत त्यांनी विचारले, “हे वेदव्यास, तुम्ही समस्त विद्येचे आणि प्रज्ञानाचे मूर्तरूप आहात.

तुम्ही वेदांचे व पुराणांचे संकलन केले आहे आणि ब्रह्मज्ञान सर्वांसाठी सुगम केले आहे. मग तुम्ही इतके उदास का दिसत आहात? हे ऋषिवर! या जगावर एखादे संकट येणार आहे का, ज्याने तुम्हाला इतके व्यथित केले आहे?"

उसासा टाकत वेदव्यास उत्तरले, "हे देवर्षी नारद, या जगावर एखादे संकट येण्याविषयी मी चिंतित नाही. मी तर माझ्या गंभीर दशेचा विचार करतो आहे. अध्ययन करण्याजोगे जे काही आहे त्या साऱ्याचे मी अध्ययन केले आहे—मला वाचण्यासारखे आता काहीही शिल्लक राहिलेले नाही. मी माझी सर्व कर्तव्ये पार पाडली आहेत; निष्ठापूर्वक नित्यकर्मांचे पालन केले आहे. मी सदैव देवी-देवतांना, ऋषिमुनींना, पूर्वजांना आणि ब्राह्मणांना अर्पणे केली आहेत. मी असंख्य यज्ञ केले आहेत. इतकेच नव्हे तर, मी पूर्ण योगावस्था प्राप्त केली आहे; मी निर्विकल्प समाधी साध्य केली आहे. माझ्या सामर्थ्यानुसार ज्या-ज्या गोष्टीवर मी प्रभुत्व मिळवू शकत होतो, त्या-त्या गोष्टीवर मी ते मिळवले आहे. हे देवर्षी नारद, हे सर्व काही मी केले आणि तरीही मी आनंदी नाही!" इतके बोलून नैराश्याने ग्रस्त असलेले ते महान ऋषी मौन झाले.

करुणापूर्ण स्मितहास्य करत ज्ञानी नारदमुनी म्हणाले, "नारायण! नारायण! हे आदरणीय महर्षी व्यास, हे खरे आहे की, सर्व नियत धार्मिक कृत्ये तुम्ही केली आहेत आणि प्राप्त करण्याजोगी समस्त विद्या व प्रज्ञान तुम्ही मिळवले आहे. पण. . . जो नित्य आनंदमय आहे त्या भगवंताच्या अमृतमय नामाचे गायन तुम्ही कधी केले आहे का? तुम्ही कधी भक्तिरसाचा स्वाद घेतला आहे का?"

महर्षी वेदव्यासांचे नेत्र विस्फारले, "नाही देवर्षी, मी भगवंताचे नाम कधीच गायले नाही."

यावर नारदमुनी उत्तरले, "हे महर्षी, हेच ते कारण आहे की ज्यामुळे तुम्हाला इतकी नीरसता आणि आनंदहीनता जाणवते आहे." 'नारायणाच्या' नामाचे संकीर्तन केल्याविना, भगवन्नामाचे अमृत प्राशन केल्याविना, भक्तिरस चाखल्याविना, निर्विकल्प समाधीमध्येदेखील आनंद नाही."

मग, महर्षी वेदव्यासांनी नारदमुनींना भगवंताचे नामगान कसे करावे, संकीर्तन कसे करावे हे शिकवण्याची विनंती केली. देवर्षींच्या उपदेशानुसार, वेदव्यासांनी त्या क्षणापासूनच भक्तिमार्गाचा अवलंब केला आणि दैनंदिन योगाभ्यासांचा एक भाग म्हणून नामसंकीर्तन करायला सुरुवात केली. भगवन्नाम गाता-गाता, अखेरीस वेदव्यास अमृतमय भक्तिरसाने भरून गेले. स्वतःच्या अंतरी तो आनंद प्राप्त करून, त्यांना त्यांच्या सर्व अभ्यासांमध्ये आनंद अनुभवास आला.

दिव्यानंदाच्या याच विस्फोटानंतर महर्षी वेदव्यासांनी श्रीभागवत पुराणाची रचना केली, या पावन भारतीय ग्रंथामध्ये, ईश्वर-भक्तीचे महिमागान केले गेले आहे. भक्तिरसाच्या प्राप्तीचे माध्यम आहे, नामसंकीर्तन.

श्रीभागवत पुराण, १.५, १.६

पुनःकथित ©२०१४ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®.